**<u>अधिक सरतपास वादींतर्फे विधिज्ञ श्रीमती एम. एन. मनोहर यांचेमार्फत शपथेवर सुरू.</u>**

१. कागदयादी नि.क्र.४ अनु. क्र.१ वर दाखल केलेल्या दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकाच्या प्रमाणित प्रतीस **नि.क्र.१७६** देण्यात येत आहे.

२. कागदयादी नि.क्र.४ अनु. क्र.२ वर दाखल केलेल्या दावा मिळकतीच्या जुना सर्वे क्र.५७/२अ च्या ७/१२ पत्रकाच्या प्रमाणित प्रतीस **नि.क्र.१७७** देण्यात येत आहे.

३. कागदयादी नि.क्र.४ अनु. क्र.३ वरील फेरफार क्र.१ च्या प्रमाणित प्रतीस **नि.क्र.१७८** देण्यात येत आहे.

४. कागदयादी नि.क्र.४ अनु. क्र.४ वरील फेरफार क्र.४७० च्या प्रमाणित प्रतीस **नि.क्र.१७९** देण्यात येत आहे.

५. कागदयादी नि.क्र.४ अनु. क्र.५ वरील फेरफार क्र.१०५० च्या प्रमाणित प्रतीस **नि.क्र.१८०** देण्यात येत आहे.

६. कागदयादी नि.क्र.४ अनु. क्र.६ वरील फेरफार क्र.७९८ च्या प्रमाणित प्रतीस **नि.क्र.१८१** देण्यात येत आहे.

७. कागदयादी नि.क्र.४ अनु. क्र.७ वरील प्रतिवादींतर्फे वृत्तपत्रात दाखल केलेल्या जाहिर नोटीसीच्या प्रतीस प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. एन. जी. देशमुख यांनी निशाणी देण्यास हरकत नसल्याचे सांगितल्यामुळे **नि.क्र.१८२** देण्यात येत आहे.

८. कागदयादी नि.क्र.४ अनु. क्र.८ वरील माझे वडील संतोष छगन गांधी यांनी प्रतिवादींच्या वकिलांना पाठविलेल्या हरकती नोटीसीची स्थळ प्रत आता मला दाखवली. त्यावर माझ्या वडीलांची तसेच वकिल श्रीमती मनोहर यांची सही आहे. मी त्या सहया ओळखते. मी वडीलांसोबत कायम राहात असल्यामुळे व त्यांनी सदर नोटीसीतील मजकुर बरोबर असल्याचे सांगितल्यामुळे तो मजकुर बरोबर असल्याचे मला माहित आहे. सदर

नोटीसीस **नि.क्र.१८३** देण्यात येत आहे.

**अधिक सरतपास पुर्ण.**

**उलटतपास प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री. एन. जी. देशमुख यांच्यातर्फे सुरु.**

९.    माझे आजोबांचे नाव छगन कृष्णा गांधी असे आहे. माझ्या आजीचे नाव भागीरथी छगन गांधी असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, छगनच्या वडीलांचे नाव कृष्णा नसुन मोतीराम असे होते. छगन यांना सहा मुले आहेत. त्यांच्या मुलांची नावे केशव, मोहन, चंदुलाल, कांतीलाल, माझे वडील संतोष आणि विलास अशी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ते सर्वजण मयत आहेत. माझे वडील संतोष यांना मी एकटी मुलगी आहे. मला इतर भावंड नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील तसेच त्यांच्या सर्व भावांमध्ये पुर्वी वाटप झाले होते. आमच्या सर्व मिळकती कोलाड येथेच होत्या. त्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही गावात आमच्या मिळकती नाहीत. हे मला माहित नाही की, चिंचवली गावात आमच्या मिळकती होत्या. हे म्हणणे खरे आहे की, वरसगावात आमच्या मिळकती आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही कोलाड गावात राहत नसुन वरसगावात राहतो. वरसगावातील मिळकतीचा गट क्र.१३१ असा आहे. त्याचा हिस्सा क्र.५७–अ आहे. त्याचे क्षेत्र १२ गुंठे आहे.

**प्रतिवादीतर्फे विधिज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्विकृत,

SANDEEP VISHNU KHAIRE
Digitally signed by SANDEEP VISHNU KHAIRE
Date: 2026.01.31 11:02:05 +0530

स्थळ : रोहा.                    (एस. व्ही. खैरे)

दि.३०.०१.२०२६                    दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), रोहा.